# लोकमान्य टिळक



पु. पां. गोखले

# लोकमान्य टिळक

पु. पां. गोखले

समाजभूषण बाबूराव गोखले स्मारक समिती,
पुणे विभाग

Lokmanya Tilak
P. P. Gokhale

**प्रकाशक**
समाजभूषण बाबुराव गोखले
स्मारक समिती, पुणे विभाग
२७३, शनिवार पेठ,
पुणे ३०

© सर्व हक्क सुरक्षित

**प्रकाशन दिनांक :**
१५ नोव्हेंबर १९९८
बाबुराव गोखले जन्मशताब्दी

**मुद्रक :**
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे-३०

**किंमत १५/- रुपये**

**पु. पां. उर्फ बाबुराव गोखले**
**यांची बालवाङ्मय सेवा**

❖

गणपती बाप्पा

जय बजरंग

समर्थ रामदास

स्वामी रामतीर्थ

लो. टिळक

गोखल्यांच्या गोष्टी

भले भले साने गुरूजी!

बंडवाले नानासाहेब

❖

**समाजभूषण बाबुराव गोखले**
**स्मारक समिती**
२७३, शनिवार पेठ, पुणे ४११०३०

# लोकमान्य नमोस्तुते।

पारतंत्र्याबद्दलच्या असंतोषाचा जनक, स्वराज्याचा मंत्रष्टा आणि परकीय सत्तेविरुद्धची संतत धार म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक! साधा मनुष्य आणि प्रगाढ पंडित म्हणूनही भारताचा मान आणि भारताची मान टिळकांनी उंचावली आहे. निष्काम कर्मयोग टिळकांनी जगाला शिकवला. भारताला संजीवनी देण्यासाठी त्यांनी शिवाजीचा राष्ट्रीय आणि गणपतीचा सांस्कृतिक उत्सव सुरू केला. 'स्वराज हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच' हा आत्मविश्वासाचा बीजमंत्र भारताला सांगितला. स्वार्थत्यागाच्या जीवनातून फुललेला स्वातंत्र्याचा वृक्ष आपल्या फळांनी आपल्या राष्ट्राला पुष्ट बनवितो व शेजारच्या राष्ट्रांना तेजस्वी संरक्षण देतो. लो. बाळ गंगाधर टिळकांच्या चरित्राचे हे प्रबोधन आहे. म्हणूनच कृतज्ञतेने आपण म्हणत असतो–

लोकमान्याय पूज्याय लोककल्याण कारिणे।
मोहशोक विनाशाय, योगेश्वर, नमोऽस्तु ते।।

–पु. पां गोखले

# लोकमान्य टिळक

एका शाळा-शिक्षकाचे चिरंजीव बाळ गंगाधर टिळक. पण ते लोकांच्या अंतःकरणावर अधिराज्य चालविणारे अनभिषिक्त राजे झाले. एवढा लोकसंग्रह करणे ही देखील कमी कर्तबगारी नाही. या कर्तबगारीची तयारी टिळक विद्यार्थिदशेपासूनच करीत होते. आपली विद्यार्थिदशा संपायच्या सुमारास आपल्या आयुष्यात आपण काय करायचे आणि काय करायचे नाही, याचा सर्वसामान्य आराखडा त्यांनी आखला होता. परिस्थितीच्या जाणिवेने लोकांना सज्ञान करून सोडायचे व त्या सेवेसाठी 'जेसुइटांच्या' धर्तीवर त्यागपूर्वक आयुष्य काढायचे, एवढेच त्या आराखड्याचे प्राथमिक स्वरूप होते. असा प्राथमिक स्वरूपाचा आराखडा आखतानाही, टिळकांनी एक अंतरीची जाणीव धरली होती. कोणत्याही राष्ट्राचा सकस नागरिक व्हायचे तर माणसाचे मन, मेंदू व मनगटे बळकट असावी लागतात. परतंत्र भारतात तर या गोष्टींची केवढी गरज! बळकट शरीरातच बळकट मन नांदते, हे जाणून टिळकांनी कॉलेजातील एक वर्ष केवळ या शरीरसंपत्तीच्या कमाईसाठी दिले होते. गोपाळ गणेश आगरकरांबरोबर आयुष्याच्या दिशेची चर्चा करून स्वतःला झीज लावून घेऊन ज्ञानप्रसार हे ध्येय ठरविल्यावर टिळकांनी त्या वेळचा रुळलेला सरकारी नोकरीचा मार्ग साहजिकच सोडला; आपली कोकणातील वडिलोपार्जित खोती जे गृहस्थ पाहत होते, त्यांनाच ती त्यांनी सुपूर्द केली; आणि ज्ञानप्रसाराचा उपाय म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकरांबरोबर पुण्यात न्यू इंग्लिश

स्कूल काढले व मोजक्या तनख्यावर जीवनास सुरुवात केली.

स्वस्तात स्वस्त शिक्षण देण्याकरिता काढलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल'चा अर्थ ही मंडळी कार्यान्तरित करू लागली. इंग्रजी विद्येला विष्णुशास्त्री चिपळूणकर वाघिणीचे दूध म्हणत. इंग्रजी विद्येने भारताच्या इतिहासाकडे व भारताच्या भाग्योदयाकडे अगदीच नव्या दृष्टीने पाहणारी ही मंडळी होती. परकीय सत्तेला 'जपून' आपली प्रगतीची पावले टाकली पाहिजेत, असे म्हणणारांचे एक प्रतिष्ठित व सरकारचे हायस्कूल चालविणारे हेडमास्तर न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांना 'उनाडटप्पू' म्हणून बसले. पण आपल्या व तरुण पिढीच्या जीवनाला राष्ट्रीय वळण लावणाऱ्या मंडळींना भारताच्या स्वतंत्र जीवनाचे पाईक असे विद्यार्थी तयार करायचे होते. लिहिला शब्द खोडायचा नाही, बोलला शब्द टाकायचा नाही आणि टाकले पाऊल मागे घ्यायचे नाही, अशी तरुण पिढी भारताच्या स्वतंत्र जीवनासाठी आणि स्वतंत्र भारताच्या प्रतिष्ठेसाठी हवी, असा नव्या शाळेतील शिक्षणाचा रोख होता. टिळक-चिपळूणकर थोडे बोलत, तरी त्यात सूचना पुष्कळ असे आणि ऐकणारांना त्या सूचनांतून ब्रह्मांड भासे. आगरकर बोलत पुष्कळ आणि शिकवायच्या विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना पृथ्विप्रदक्षिणा घडवीत. पण सगळ्यांचा संदर्भ शेवटी एकच होता. इंग्रजी विद्येने आणि युरोपच्या इतिहासाने राष्ट्रीय सामर्थ्याची जी उबग निर्माण केली, तिचा पुरेपूर फायदा उठवून भारताचा कायापालट करणारे तरुण तयार करणे हे न्यू इंग्लिश स्कूलचे वळण होते. लोकांना ते पटल्यामुळेच शाळा लोकप्रिय होत गेली आणि तिच्या जोडीला एका कॉलेजची आवश्यकता भासून टिळक-आगरकरांना डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करता आली.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन होऊन कॉलेज-शाळांचा जम बसू लागला आणि या चैतन्यसंजीवनीतून नवा राष्ट्रीय दम

निर्माण होईल असा रंग दिसू लागताच कालपुरुष खदखदा हसला! टिळकांच्या पिळाची आणि दिलाची सर्वच मंडळी त्यांच्या स्वतःच्या संस्थेतसुद्धा शंभर टक्के कशी मिळणार? म्हणून मतभेदाच्या वावटळी सुरू झाल्या आणि शिक्षकाचा हौसेने पत्करलेला पेशा टिळकांना १८९० साली हातावेगळा करावा लागला.

तरी शिक्षक टिळक प्रभावीच होता. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना उमलत्या व उगवत्या पिढीला शिक्षण देण्यासाठी झाली होती. तरी कर्त्यासवरत्या पिढीला तारीखतागायत शिक्षण देण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूलच्याच चालकांनी 'केसरी' व 'मराठा' ही वृत्तपत्रे १८८१ पासून सुरू केलीच होती. संपादक म्हणून लोकशिक्षणाचे काम ही मंडळी करीत असता, टिळक प्रथम 'मराठा' या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक होते. महाराष्ट्रीय जनतेचे मन राज्यकर्त्या इंग्रजाला आणि अन्यभाषिक व अन्यप्रांतिक भारतीयांना कळावे, हा कटाक्ष 'मराठ्या'च्या संपादनात होता. भारतीय तेवढा सगळा एक; तो 'मेळवून आणि युक्तिबुद्धीने सज्ज करून' राजकीय पारतंत्र्याच्या विरुद्ध उभा करावा, असे 'मराठ्या'चे टिळकांनी केलेले संपादन विकसू लागले. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या धोरणातील भारतघातक बारकाव्यांवरदेखील टिळकांनी केलेल्या भडिमाराने परकीय सत्तेच्या डोळ्यांवर टिळक आल्याशिवाय राहिले नाहीत. गस्त घालणाऱ्या रक्षकाप्रमाणे वृत्तपत्रांनी जागर केला पाहिजे असा विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा दंडक असल्याकारणाने जेथे जेथे अन्याय दिसेल तेथे तेथे अन्यायकांवर तुटुन पडून अन्यायिताला न्याय मिळवून देण्यावर 'केसरी-मराठा' च्या संपादनाचा कटाक्ष होताच.

कोल्हापूरचे छत्रपती शिवाजीमहाराज यांचा कारभारी बर्वे यांनी चालविलेला अमानुष छळ 'केसरी-मराठ्या'नी पहिल्या वर्षी चव्हाट्यावर मांडला. न्यायदेवतेला लागणाऱ्या कायद्याच्या चौकटीत

बसण्यासारखी पुराव्याची तरतूद न होऊ शकल्या कारणाने 'मराठ्या'चे संपादक म्हणून टिळकांना आणि 'केसरी'चे संपादक म्हणून आगरकरांना, बर्व्यांनी केलेल्या बेअब्रूच्या फिर्यादीतून दोन गुन्ह्यांसाठी चार-चार महिन्यांची झालेली सज़ा 'एकसमया-वच्छेदेकरून' भोगावी लागली. तरी लोकमताने टिळक-आगरकरांच्या बाणेदारपणावरच आपले कृपाछत्र धरले. लोकसंग्रहाची व लोकप्रेमाची ही प्रभा आपल्या पाठीवर असली की, प्रबळ अशा परकीय सत्तेलाही सळो की पळो करून सोडायला भारतीयांनाही अशक्य नाही, ही जाणीव टिळकांना चैन पडू देईना. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पारतंत्र्य टिळकांना इतरांच्या इतकेच बोचत होते. तरी एक राजकीय पारतंत्र्य उडाल्यास बाकीची पारतंत्र्ये पाखरासारखी उडविता येतील, असा टिळकांना सात वर्षांच्या संपादनाने आत्मविश्वास येऊ लागला. कारण दुसऱ्याच देशांतील लोकांनी आपल्यावर राज्य करायचे आणि भारतीयांनी त्या परकीय सत्तेला निष्ठावंत राहायचे, याच्याइतका मानवी अन्याय तरी कोणता? टिळकांच्या अभ्यासू मनाला या अन्यायाची एवढी चीड आली की, शाळा-कॉलेजांच्या संचालनासाठी राजकीय पारतंत्र्याची चीड जनमानसात निर्माण करण्याच्या आपल्या संपादकीय कर्तव्याला मुरड घालण्यापेक्षा, शैक्षणिक संस्थांच्या संचालनापासून वृत्तपत्रांचा संसार वेगळा करून तो सर्वस्वी आपल्या अंगावर घेणे टिळकांनी अधिक पसंत केले.

१८८८ सालापासून 'केसरी-मराठ्या'ची (कर्जासहसुद्धा) टिळकांनी जबाबदारी पत्करली. १८९० मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसयटीतून मुक्त झाल्यावर ही दोन पत्रे चालविणे आणि स्वतंत्र लॉ क्लास चालविणे असा टिळकांच्या व्यवसायाचा भाग झाला. या व्यवसायाच्या जोरावर टिळकांनी गायकवाड-वाडा खरेदी केला व सिंहगडला दोन छोटी घरे उभारली. टिळकांच्या लॉ-क्लासला

व वृत्तपत्रांना लोकांचा आश्रय कसा होता, हे यावरून स्पष्ट होणारे असून १८९७ साली टिळकांच्यावर झालेल्या खटल्यापासून टिळकांची लोकप्रियता जशी जगाच्या प्रत्ययास येऊ लागली तशीच टिळकांची वार्षिक प्राप्ती तीस हजारांच्या घरात असल्याचा कयास १९०८ च्या खटल्याच्या वेळी परकीय सत्ताधाऱ्यांच्या टेहळ्यांनी बांधलेला होता. तो कयास खरा खोटा कितपत हे पाहत बसण्यात अर्थ नाही. कारण 'केसरी-मराठ्या'ची आर्थिक चिंता कमी झालेली नव्हती. १८९७ सालच्या खटल्याच्या वेळीच टिळकांना साहाय्य म्हणून चाळीस हजार रुपयांचा ओघ जनतेकडून वाहिला, अशी नोंद सरकारी टेहळ्यांनी केली आहे. हाती घेतलेले लोकशिक्षणाचे काम टिळक किती भक्तिभावाने करीत होते, याचे हे प्रत्यंतर आहे. एका बाजूने सरकारची अशी गैरमर्जी होत असताही सामान्य लोकांचा पुढारी म्हणून व भारताचा कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून आपल्यावर असलेल्या जबाबदाऱ्या टिळक विसरले नव्हते. १८९६-९७ साली प्लेग व दुष्काळ यांनी कहर मांडला असता, पुणे केंद्रात आलेल्या युनिव्हर्सिटीच्या परीक्षार्थींना टिळकांनी जाहीर व्याख्याने देऊन 'दुष्काळ-विमा-निधी'च्या अस्तित्वाची जाणीव दिली; एवढेच नव्हे, तर आपापल्या गावी परतल्यावर सदर निधी विस्तारण्याची चळवळ हाती घ्यावयास, जनतेला उत्तेजित करा, असाही उपदेश त्या परीक्षार्थींना केला. टिळक स्वतःही पुणे-सोलापूर जिल्ह्यांतून हिंडले आणि रयत, कोष्टी व गरीब जनतेचे सरकारकडून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत 'वैरणचारा' सारख्या छोट्या गोष्टींपासून जितके साहाय्य मिळवता येईल, तेवढे त्यांनी पराकाष्ठेने मिळवावे, म्हणून उत्तेजन दिले. गोरगरिबांनी ज्या वेळी पुण्याच्या शहर हद्दीतील व लष्करहद्दीतील दुकाने लुटण्याचा मांड मांडला, त्या वेळी टिळकांनीच त्यांना तशा अपकृत्यापासून परावृत्त केले आणि धान्याच्या व्यापाऱ्यांनी

साठेबाजीचा जो व्यूह रचला होता, तो आपल्या काही स्नेह्यांच्या साहाय्याने 'स्वस्त धान्याची दुकाने' काढून टिळकांनी उधळून टाकला. अशा तऱ्हेने टिळकांनी लोकानुरंजन किंवा 'लोकलहरीप्रमाणे भरारी', अशी लोकसंग्रहाची खोटी व्याख्या कधीच आचरणात आणली नाही. लोकांतील सत्प्रवृत्तींना सन्मानाने प्रोत्साहन आणि असत्प्रवृत्तींना आळा, असे 'प्रजानुरंजन' टिळक करीत असल्याकारणानेच त्यांना लोकांच्या अंतःकरणाचा 'राजा' होता आले. पुण्यात प्लेगने कहर केला, तर टिळकांनी पुण्यात राहून लोकांच्या सेवेसाठी हॉस्पिटल काढले व प्लेगोबाचे दमन करण्यासाठी सरकारी प्रयत्नाला सर्व तऱ्हेची सात्त्विक साथ दिली. हे सर्व करीत असताना आणि प्लेग-दुष्काळ नसल्या वेळच्या सौम्य काळातही टिळक आपल्या सामाजिक कर्तव्यांना व कौटुंबिक कर्तव्यांना विसरले नव्हते.

सामाजिक सुधारणा आणि औद्योगिक सुधारणा पारतंत्र्याच्या काळातही निश्चितपणे उघडल्याच पाहिजेत. त्या समाजाच्या 'चालीने चालून आणि बोलीने बोलून' जशा खंबीर होतील, तशा प्रक्षोभ उठविल्याने होणार नाहीत. कारण 'केल्याने होत आहे रे! आधी केलेचि पाहिजे!' अशा त्या सुधारणा होत. भारताचा इतिहास हजारो वर्षांच्या घडामोडीने घडला आहे. वैदिक काळापासूनच्या परंपरा भारतात चालू आहेत. त्या राजकीय पारतंत्र्याचे उच्चाटन झाल्याशिवाय क्रांतीच्या मार्गाने कायापालट करणार नाहीत. निश्चित कृतीच्या उत्क्रांतीच्या मार्गानेच तेथे प्रगती साधता येईल. टिळकांनी असा वेध घेतला असल्याकारणाने १८९० साली काही सामाजिक सुधारणांची निश्चित कृतिरूप आखणी करून टिळकांनी आपल्या सहीनिशी त्यांना चालना दिली. माणूस एका विशिष्ट जमातीत जन्मला आहे म्हणूनच तो अस्पृश्य असू शकतो, असे खुद्द परमेश्वर म्हणेल, तर त्याला मी परमेश्वरच मानणार नाही. असे

टिळकांनी जाहीर सभेत निक्षून सांगितले. अस्पृश्यता निवारणासाठी नित्यनियमाने काही प्रत्यक्ष सेवा रोजच्या रोज करण्याच्या प्रतिज्ञापत्रकावर टिळकांनी सही केली नाही, याचे कारण त्याच कार्याला नियमाने देण्यासारखा वेळ टिळकांच्या कार्यव्यापृतेत नव्हताच. औद्योगिक सुधारणांबाबतही त्यांनी दोन-चार प्रयत्नांत पुढाकार घेतला आणि पैसा फंडासारख्या प्रयत्नाला उत्तेजिले; पण त्या दिशेने स्वतःला वाहून घेतले नाही. राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रा. विजापुरकरांच्या प्रयत्न-प्रपंचाला टिळकांनी आटोकाट साहाय्य केले, पण त्या कार्याला नियमितपणे बांधून घेतले नाही. त्या त्या कार्याचा आवाका आणि आवड असणाऱ्या कर्त्या पुरुषांच्याकडे श्रमविभागणीच्या तत्त्वावर ती तीं कार्ये सोपवून आपल्याला त्यात जेवढे आपल्या फुरसतीने करता येईल, ते ते प्रत्यक्ष करीत राहून राष्ट्राची शक्ती त्या त्या बाजूंनी वाढू द्यायची, असे टिळकांचे धोरण होते. टिळकांच्या स्वतःच्या प्रपंचाबाबतही तेच म्हणावे लागते. आपली गृहलक्ष्मी व भाचे धोंडोपंत विद्वांस आणि तात्यासाहेब केळकर यांच्याकडेच सर्व घरचा व केसरी-मराठा संस्थांचा योगक्षेम सोपवून आवश्यक तेवढ्या गोष्टींत चौकशीने व सल्लामसलतीने आणि योजकतेने तेवढा भाग टिळकांनी घेतला, तेवढाच त्यांचा स्वतःचा प्रपंच. मंडालेहूनसुद्धा टिळकांनी मुलांच्या शिक्षणाची व गृहलक्ष्मीच्या प्रकृतीची काळजी वाहिली. पण कुटुंबियाचे आणि नागरिकाचे अपरिहार्य कर्तव्य, एवढेच त्याचे स्वरूप होते.

आणि असे होणे क्रमप्राप्तच होते. भारताचे राजकीय पारतंत्र्य हेच भारतातील सर्व अनर्थांचे मूळ असल्याकारणाने ते मूळच उपटून निघेल कसे, याचा ध्यास टिळकांच्या मनाने घेतला होता. 'घोडा का बुजतो? भाकरी का करपते? पाने का कुजतात?' या साऱ्या प्रश्नांना जसे 'फिरवली नाही म्हणून!' हे एकच उत्तर, त्याचप्रमाणे हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर अशा वादासारख्या

भारतातील सर्व अनर्थांचे मूळ 'परसत्ते'त टिळकांना दिसत होते. चंद्रगुप्तापासून रावबाजीअखेर भारतात ज्या घडामोडी झाल्या त्यात रजपुतांचे पराक्रम आणि छत्रपती शिवाजीमहाराजांचे स्वराज्य हीच काय ती अभिमानास्पद अशी प्रकरणे होती. परकीय स्वाऱ्यांच्या आणि पारतंत्र्याच्या वावटळींनी आणि वणव्यांनी निस्त्राण झालेल्या आपल्या मायभूमीला राजकीयदृष्ट्या स्वतंत्रही केली पाहिजे आणि इंग्रजी राजवटीबरोबर परिचित झालेल्या पाश्चिमात्य विज्ञानाची, यंत्रयुगाची आणि लोकशाहीची जोड राजकीय स्वातंत्र्याला देऊन आधुनिक जगाच्या प्रागतिक राष्ट्रांत भारताला प्रतिष्ठेचे स्थान मिळाले पाहिजे, ही टिळकांच्या अंतःकरणाची तळमळ होती. म्हणून 'केसरी-मराठ्या'चे संपादन सुरू केल्यापासून या एका गोष्टीचे ज्ञान लोकांना व्हावे, याविषयी टिळकांनी आपली सारी बौद्धिक करामत केंद्रित केली. क्रॉफर्ड प्रकरणात मामलेदारांना न्याय मिळवून देण्यासाठी टिळकांनी लेखणी सरसावल्यापासून टिळक सरकारच्या डोळ्यांवर आले असे काही विचारवंत समजतात तर 'संमती वयाच्या' बिलाच्या निमित्ताने परकीय सत्तेच्या भारतीय समजारचनेतील लुडबुडीला टिळकांनी जो विरोध केला तेथपासून, टिळक सरकारच्या व लोकांच्या विशेष लक्षात राहिले, असे काही विचारवंत मानतात. पण टिळकचरित्राचा बारकावा लक्षात घेणारांना ठाऊक आहे की, टिळक-आगरकर यांनी संपादकीय लेखणी ज्या दिवशी प्रथम हाती घेतली, त्या दिवशीच ती एक पाय तुरुंगात ठेवूनच घेतली होती. कोल्हापूरचे बर्वे प्रकरण हाताळताना छत्रपती घराण्याचा अभिमान आणि बर्वे कारभाराची घाण टिळकांना जेवढी प्रगट करायची होती, तेवढाच ज्या परकीय सत्तेचा हस्तक बर्वे होते, त्या परकीय सत्तेच्या अरेरावीचा धिक्कारही जनमनात टिळकांना उठवायचा होता. म्हणून इंग्रजी राजवटीबद्दलच्या असंतोषाचा जनक होण्याचा मुहूर्त टिळकांनी तेथपासूनच साधला होता. असे

म्हणायला काहीच हरकत नाही. 'केसरी-मराठ्या'ची मालकी व संपादकीय जबाबदारी सर्वस्वी आपल्याकडे घेतल्यावर टिळकांनी निरंकुशपणे आपली ती वृत्ती चालविली. 'जुळते न घेणारा' परकीय सत्तेचा विरोधक ही आपली भूमिका टिळकांनी पुढे अशी अखंड चालविली की, व्याख्यान वा संपादकीय लिखाण यांचे ते ध्रुवपदच बनले.

परकीय सत्तेबद्दलचा असंतोष जनमनात पिकविताना निश्चित ध्येयाची पेरणीही टिळक करीत होते. 'यावच्चंद्र दिवाकरौ' 'हिंदुस्थानवर राज्य करण्याचा ताम्रपट काही परमेश्वराने इंग्रजांना दिला नाही', असा आपला अभिप्राय प्रारंभी करणारे टिळक १८९३ पासून गणपतीउत्सव सार्वजनिकरीत्या करू लागले आणि त्याच्या जोडीला शिवाजी उत्सवाची भर त्यांनी १८९५ मध्ये घातली. देवघरातला गणपती त्यांनी सार्वजनिक चौकात आणला. लोकपुढाऱ्याने आपल्या व्यासपीठावर जनतेपासून अलिप्त बसून लोकशाहीत चालणार नाही, त्याने लोकांत मिळाले-मिसळले पाहिजे व हव्या त्या क्षणी तो लोकांना मिळाला पाहिजे, हा नवा जमाना गणपतीउत्सवाच्या रूपाने टिळकांनी जसा सुरू केला, तसाच धार्मिक उत्सवांनाही जीवनाची जोड दिली पाहिजे, 'देह आणि देव यांच्यामध्ये देश आहे' हे कोणीही विसरता कामा नये आणि राजकारणाला अध्यात्माचे पावित्र्य मिळाले पाहिजे, हेही गणपतीउत्सवाच्या निमित्ताने टिळकांना लोकांच्या मनावर ठसवायचे होते. आळीनिहाय गणपती, गणपती-निहाय मेळा, मेळा-निहाय मर्दानी वृत्तीचे तरुण आणि तरुणा-निहाय राष्ट्रीय सकसपणाची स्फूर्तीदायक गाणी, असे टिळकांचे गणपतीउत्सवातील प्रमेय होते, असे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या व विसाव्या शतकातील पहिल्या दशकात ब्रुईनसारख्या सरकारी टेहळ्यांचे काम करणारांनी नमूद करून ठेवले आहे. चव्हाट्यापासून चुलीपर्यंत राष्ट्रीय जागृती पोचविण्याचा तो मार्ग

होता. मेळ्यांतून म्हटल्या जाणाऱ्या पदे-पोवाड्यांतून ऐतिहासिक विभूतींपासून स्फूर्ती मिळत राहावी हे जसे ध्येय होते तसेच प्रचलित प्रश्नावरही मार्गदर्शन व्हावे, हाही हेतू होता. मेळ्याव्यतिरिक्त गणपतीउत्सवातून होणाऱ्या कथा-कीर्तनांतून व व्याख्यान-प्रवचनांतून तीच दृष्टी होती. 'जुन्यातून नवे उमलविताना' परकीय सत्तेबद्दलचा असंतोष हा प्रत्येक कार्यक्रमाचा दृढभाजक असे. शिवाजी उत्सव तर उघड-उघड राजकीय उत्सव होता. शिवाजीने जे केले ते नव्या काळात नवीनपणाने का करता येऊ नये, असा तरुणांना खडा सवाल त्या उत्सवाच्या निमित्ताने टिळकांनी टाकला होता. एरवी सटर-फटर वाटणाऱ्या वाङ्मयातून राजकीय जागृतीची लाट उसळविणाऱ्या वक्त्याप्रवक्त्यांची लाटच त्या काळात उसळली होती. 'साध्याही विषयांत कधी किती मोठा आशय आढळे!' असे त्या काळी जनमनाला होऊन जाई. या सगळ्या साधनोपसाधनांतून लोकशाही स्वराज्याची आकांक्षा निर्माण केली जाई. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच' हा टिळकांचा उद्घोष जनमनाचा प्रातिनिधिक उद्घोष म्हणून ऐतिहासिक महत्त्व पावला.

टिळकांना लोकशाही स्वराज्य हवे होते आणि त्यासाठी दृढनिश्चयाने व चिकाटीने झटत राहणे हा टिळकांचा अभ्यास व हव्यास होता. त्याच्या जोरावर लोकमत पाठीशी घेऊन टिळक परकीय सत्तेशी झगडा करीत होते. लोकांना परकीय सत्तेबद्दलच्या असंतोषाचे धडे जसे टिळक देत होते, तसेच स्वराज्याच्या बांधणीचे उपक्रमही टिळक लोकांना शिकवत होते. तागडीतलवारींनी भारताचे राज्य घेऊन ते चालविणाऱ्या इंग्रजांना त्यांच्याच मापाने मापायचे तर आणि स्वतःच्या आर्थिक उन्नतीची बाजू सावरायची तर, स्वदेशी वस्तूंचा वापर आणि परदेशी वस्तूंचा बहिष्कार असे दुधारी शस्त्र लोकांना वापरता येणे शक्य आहे, हे जाणून १८९५



सालीच स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीचा नारळ सातारा येथे टिळकांनी फोडला. गणपती-शिवाजी-उत्सवांतून स्वाभिमानाची जी ज्योत पाजळली होती, तिचे कृतिरूप तेज स्वदेशीने पसरवणे क्रमप्राप्तच होते. परकीय सत्तेच्या असंतोषाला, अकरणात्मक का असेना, पण कृतीचे रूप द्यायचे तर बहिष्कार हाच त्याचा उपाय होता. टिळकपूर्व राष्ट्रीय पुढारी समाजाशी व सरकारशी लघुत्तम विरोधाने चालत होते. टिळकांनी समाजाशी संपूर्ण समरसता आणि परकीय सरकारशी लघुत्तम सहकार असा जमाना उभा केला. 'लाइन ऑफ लीस्ट रेझिस्टन्स'च्या ऐवजी 'लाइन ऑफ लीस्ट असिस्टन्स' सरकारबाबत टिळकांनी उभी केली. हे सर्व प्रचलित कायद्याच्या अंतिम मर्यादेचे स्वातंत्र्य घेऊन करायचे हा टिळकांचा दंडक होता. त्यात मग प्रसंगी कायदेभंग झाला तर त्याची पर्वा करणारे ते नव्हते. १९०८ सालच्या खटल्यात ज्यूरीने आपल्याला दोषी ठरविलेले पाहून 'मानवी न्यायमंदिराच्या पलीकडेही

परमेश्वरी शक्ती आहे. तिचीच इच्छा असेल की माझ्या देहदंडाने या राष्ट्राचे कल्याण व्हावे तर त्यालाही माझी तयारी आहे.' या अर्थाचे उद्‌गार जे टिळकांनी काढले, त्यातील रहस्य टिळकांच्यावरील तऱ्हेच्या राजकीय प्रेरणेत आहे. या प्रेरणेमुळेच लोकांनी उघड आणि सशस्त्र बंड करण्याचा पीळ दाखविला असता, तर त्या उघड आणि सशस्त्र बंडाचे पुढारीपण करण्यासही टिळकांनी कमी केले नसते.

१९१५ साली दक्षिण आफ्रिकेतून भारतीयांच्या स्वाभिमान-संरक्षणार्थ सत्याग्रह करून आलेल्या गांधींचा गौरव करणाऱ्या टिळकांना लघुत्तम सहकारातून उघडपणे निःशस्त्र प्रतिकार प्रथम निर्माण होईल याची पुरेपूर खात्री होती. म्हणूनच आफ्रिकेतील कामगिरीबद्दल गांधींचा गौरव मुंबईस माधवबागेजवळील हिराबागेत ता. १३ जानेवारी १९१५ रोजी डॉ. साठे यांच्या मुंबई नॅशनल युनियनतर्फे झाला असता, टिळकांच्या पायाला हात लावून गांधींनी वंदन केले व टिळकांनी साठ्यांना सांगितले की, 'यू हॅव सिक्युअर्ड दि बेस्ट मॅन फॉर युवर युनिअन. डू नॉट लूज हिम. रिझर्व हिम.' त्यामुळे जालियनवाला बागेत रौलेट ॲक्टच्या निषेधार्थ लोक जमले असता, जनरल डायरने केलेल्या अमानुष अत्याचारांना लोकांनी तोंड दिले आणि ते मोडले पण वाकले नाहीत, ही वार्ता ज्या वेळी इंग्लंडात टिळकांनी ऐकली, तेव्हा गांधींनी पुढे सुरू केलेल्या संग्रामात भाग घ्यावयास आपणास सापडले नाही, याबद्दल त्यांना हळहळ वाटल्याचे सर्वप्रसिद्ध आहे. ता. १५ मे १९१९ रोजी डॉ. साठे यांना लंडनहून टिळकांनी जे स्वदस्तुरचे पत्र लिहिले आहे, त्यात त्यांनी स्पष्टच लिहिले आहे की, 'आपण गांधींना सर्वतोपरी पाठिंबा दिलाच पाहिजे हे मी तुम्हाला अगोदरच लिहिले आहे.' १९२० ऑगस्टपासून गांधी जो असहकाराचा व आत्मक्लेशाचा देशव्यापी कार्यक्रम परकीय सत्तेविरुद्ध उभा करणार

होते, त्याला काँग्रेसने व राष्ट्राने साद दिल्यास आपण त्या कार्यक्रमाला उत्कृष्टातला उत्कृष्ट उठाव आणू असे टिळकांनी गांधींना आश्वासनही दिले होते. भारतात व्हायचे हे लोकशाहीचे स्वराज्य व्हायचे असल्या कारणाने लोकमताच्या जिव्हाळ्याची धार टिळकांना आवश्यक वाटे. ती प्रखरतम झाली की सशस्त्र-निःशस्त्र जे साधेल त्या बंडाच्या तयारीपर्यंत मजल मारण्याची टिळकांची धमक होती. लोकमताची ती धार पेलण्याबद्दलचा टिळकांचा आत्मविश्वास एवढा जबर होता की, त्या काळात तरी गांधींना तो टिळकांचा आत्मविश्वास साहसाचा वाटे. लोकांच्या कृतिपूर्ण पाठिंब्यावरच टिळक बंडापर्यंत उडी मारण्यास तयार असल्याकारणाने आणि लोकमतावरच सज्ञानपणे भारताची लोकशाही चालवायची असल्याकारणाने, एखाद्या व्यक्तीने अधिकाऱ्याविरुद्ध साहसाने उठणे आणि प्रसंगवशात गनिमीकाव्याच्या शिताफीने त्या अधिकाऱ्याला फ्रान्सच्या लुईप्रमाणे अगर इंग्लंडच्या चार्लसप्रमाणे कंठस्नान घालणे हे साहस टिळकांच्या बंडखोर राजकारणातही बसत नव्हते. कोणताही अधिकारी राज्ययंत्रणेचा दुवा असतो. तो नाहीसा करण्याने यंत्रणा नाहीशी होत नाही.

अल्पकाळ दुबळी झाल्यासारखी वाटली तरी नव्या जोडणीने प्रबलतर होते आणि त्यातून निर्माण होणाऱ्या दडपशाहीने अफाट जनता भेदरली नाही तरी काही काळ तरी कमकुवत होते. लोकांच्या सामुदायिक सामर्थ्यामध्ये सारखा सकसपणा रसरसत राहिला तरच लोकशाही तेजस्वीपणे टिकते. टिळकांना हे राजकारणाचे सशास्त्र ज्ञान असल्यामुळे ते 'क्रांतिकारी' म्हणविणाऱ्या वैयक्तिक आगडोंबाला कधीच उत्तेजित नसत. तथापि बुद्धिमान तरुणांना तशा मार्गाने जाण्याची आणि आपली आत्माहुती देण्याची गरज 'आकाश अंत न कळूनही अंतरिक्षी। शक्तीनुसार करतात विहार पक्षी।।' या देशभक्तीच्या कर्मयोगी प्रवृत्तीतून भासत असल्याने, त्या देशभक्तीचा

गौरव करण्यास टिळकांनी कधीच माघार घेतली नाही.

टिळकांच्या या राजकीय प्रक्रियेचे पृथक्करण परकीय सत्तेच्या सूत्रधारांपुढे स्वच्छ असल्याकारणानेच लोकांच्यापासून टिळकांना दूर ठेवण्याचे सर्व सूक्तासूक्त उपचार केव्हाही करण्यास त्या सूत्रधारांनी कमी केले नाही. १८९७ व १९०८ सालचे राजद्रोहाचे टिळकांवर झालेले खटले वरील विधानांची ठळक उदाहरणे म्हणून सर्वांसच ठाऊक आहेत. स्वदेशीबरोबर बहिष्कारात परकीय वस्तूंबरोबर परकीय सरकारवरचाही बहिष्कार अभिप्रेत असल्याचा निर्वाळा टिळकांनीच सुरत काँग्रेसनंतर कलकत्त्यास झालेल्या आपल्या 'नव्या पक्षाची सूत्रे' या व्याख्यानात दिला होता हे इंग्रज सरकार कसे विसरणार? म्हणून मंडालेहून टिळक सुटून आले तरी त्यांच्यावरील आणि त्यांच्याकडे येणाऱ्या जाणाऱ्यावरील सरकारची कडक नजर सुटली नव्हती. आपल्या सहा वर्षांच्या गैरहजेरीत सरकारी दडपशाहीमुळे लोकांच्या राजकीय चैतन्याला शैथिल्य आल्याचे लक्षात घेऊन टिळकांनी १९१५ च्या प्रारंभालाच 'होमरूल लीग' काढण्याचा मनसुबा केला होता. पण कैसरीकंदनाच्या वातावरणात भांबावलेले साम्राज्यसरकार टिळकांना संकटात आणील, म्हणून टिळकांनी त्या कार्यक्रमास तेवढ्यात हात घालू नये, असा सल्ला ना. गोखलेंनी टिळकांना दिला व तो त्यांनी मानला, अशी सरकारी हेरगिरीनेदेखील नोंद केली आहे, असे म्हणतात. टिळकांनी सावधगिरी म्हणून स्वराज्यसंघाची स्थापना लांबणीवर टाकली तरी लोकांत उत्थापन करण्याची त्यांची ईर्ष्या दबली नव्हती. 'इंग्लंडची अडचण तेच हिंदुस्थानचे संधिसाधन' या सूत्रावर टिळकांनी भारतीयांना कैसरी युद्धाच्या वेळी रंगरूट होण्याचा सल्ला दिला. सहकार्यासाठी टिळकांनी पुढे केलेल्या या हातावर सरकारी सत्तेचा विश्वास नव्हता! कारण टिळकांपेक्षाही जहाल असणारे पण टिळकांना मानणारे आणि टिळकांनीच उत्तेजित

केलेल्या राष्ट्रीय शाळेतील व ट्रेनिंग कॉलेजातील एक वेळचे विद्यार्थी असलेले, पण आता नव्या दमाचे झालेले तरुण देशभक्त कैसरीकंदनाचा मोका साधून, जर्मनीने तांबडा समुद्र आवळून धरताच हिंदुस्थानात सशस्त्र बंड उठविण्याच्या फंदासाठी गोमांतकातून, जपानातून, जर्मनीतून आणि अमेरिकेतून उठाव करण्याच्या खटपटीत असल्याची जाणीव ब्रिटिश सरकारास होती. म्हणून रंगरूटभरतीलाही चालना देणाऱ्या टिळकांना 'युद्धसहाय्यक सभांना न बोलाविण्याचेच धोरण' सरकारने ठेवले. वर उल्लेख केलेल्या जहाल तरुण देशभक्तांच्या प्रयत्नांचा आणि टिळकांच्या धोरणाचा बिसतंतूनेही जोडदुवा असल्याचे काही माप नव्हते. पण रंगरूटभरतीच्या प्रोत्साहनाबरोबर 'भारत संरक्षक सैन्य' या बादशहांच्या जाहीरनाम्यातील शब्दप्रयोगाचा फायदा टिळकांकडून होमरूल लीगच्या चळवळीद्वारा उठविला जात आहे, हे टिळकांच्या धोरणातील कसब सरकारास स्पष्ट दिसत होते.

'स्वराज्य आणि संरक्षण ही जुळी खाती आहेत' असा त्याबाबत टिळकांचा उद्घोष होता. म्हणून होमरूलच्या चळवळीतील टिळकांच्या काही व्याख्यानांबद्दल टिळकांवर खटले भरून त्यांचे तोंडच बंद करण्याची कारवाई सरकारने केली. पण हायकोर्टातील न्यायदेवतेने टिळकांच्या बाजूने कौल दिला. कैसरीकंदनामुळे निर्माण झालेले पेचप्रसंग लक्षात घेऊन या वेळी सरकारही वागत होते व टिळकही संचारत होते. देशाच्या स्वातंत्र्याच्या तळमळीने आत्यंतिक टोकाला गेलेले तरुण नामोहरम नव्हे, तर नामशेष करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय साम्राज्यसरकारचे पाईक राहणार नाहीत याची जाणीव टिळकांना होती. त्याच सुमारास आपली सनदशीर चळवळ उग्र राखली तर दोन्ही आघाड्यांवर सामसूम होईल आणि राष्ट्राचे खच्चीकरण होईल म्हणून टिळक 'प्रतियोगी सहकाराच्या' सौम्य मार्गाने आपली पावले टाकीत होते. लघुत्तम विरोधाच्या धोरणाला

मुरड घालून टिळकांनी परकीय सत्तेला लघुत्तम साह्य करण्याचे धोरण प्रारंभिले, त्याचाच हा विकास होता. लघुतम साह्यातून भारताने आपल्या स्वतंत्र व स्वाभिमानी अस्तित्वाची जाणीव परकीय सत्तेस व तिच्या द्वारा जगास दिली पाहिजे, म्हणून स्वदेशीचे व्रत टिळकांनी राष्ट्राला दिले होते. त्याचबरोबर लघुत्तम विरोधाच्या ऐवजी लघुत्तम चिमट म्हणून बहिष्काराचेही व्रत राष्ट्राला आचारावयास टिळकांनी सांगितले होते. आपल्या सर्वच जीवनात राष्ट्रीयत्व पाहिजे हे शिक्षण देऊन टिळकांनी राष्ट्राला प्रगट दर्शनाचे वळण लावले होते.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात दादाभाई नौरोजींच्या आशीर्वादाने कलकत्त्याच्या कॉंग्रेसमध्ये स्वराज्याची जी चतुःसूत्री टिळकांनी राष्ट्रमान्य करून घेतली होती, तिच्या उग्र चळवळीने राष्ट्र स्वराज्याकांक्षी झाले होते. त्या स्वराज्याकांक्षी राष्ट्राला प्रत्यक्ष सत्ता हाताळण्याचे अवसान यायचे तर सत्तासंरक्षणाचीही धमक पाहिजे. म्हणून कैसरीकंदनाच्या निमित्ताने रंगरूटभरतीचा प्रचार टिळकांनी चालविला. तसा स्वराज्याच्या भरीव हक्कांच्या मागणीचाही सपाटा चालविला. ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणासाठी अकरा रुपये पगारावारी आपले रक्त रणांगणावर सांडण्याइतके ते स्वस्त नाही. ते सांडायचे तर ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणाबरोबर स्वयंतंत्र होऊ लागलेल्या भारताची निर्मिती झाली पाहिजे, हा ठसा मुंबईच्या मजुरांसारख्या जनमतावर टिळक उमटवू लागले. टिळकांची प्रतियोगी सहकारिता ही अशी असल्याकारणाने ब्रिटिश सरकारला टिळकांची पीडा वाटत होती; तरी टिळकांचे लोकांवरील वजन सरकारलाही नाकबूल करता येणार नव्हते. १९०८ साली टिळकांची खोड मोडण्यासाठी त्यांना मंडालेची प्रदीर्घ शिक्षा दिली तर मुंबईच्या मजुरांनी टिळकांबद्दलच्या आदराने हरताळ पाळला होता, हे सरकारला ठाऊक होते. टिळक सुशिक्षित असले तरी त्यांची

चळवळ सुखासीन राजकारणाची नव्हती. तेल्यातांबोळ्याचे पुढारी म्हणून त्यांची त्या वेळी कितीही चेष्टा झाली असली आणि त्या चेष्टेचे मानकरी, ब्रिटिश सत्तेचे मांडलिक व आंग्लविद्याविभूषित कितीही मिरवत असले, तरी इंग्रज सरकार पक्के जाणून होते की लोकशक्तीच्या उपासनेसाठी टिळक आपली विद्वत्ता कारणी लावीत आहेत. ती विद्वत्तेची लोकाभिमुखता ब्रिटिश साम्राज्याची भारतातील बैठक लटपटीत करणार, हीच खरी सत्ताधाऱ्यांची भीती होती. टिळकांची विद्वत्ताही दिखाऊ नव्हती, तर पश्चिमात्य विद्वानांना मान्य होती; याचेही प्रत्यंतर ब्रिटिश सत्तेला होते.

१८९७ साली काही पाश्चात्य विद्वानांच्या मध्यस्थीमुळेच टिळकांच्या शिक्षेत सौम्यतेची सवड आपण दिली होती, याचा विसर ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना कसा पडलेला असेल? म्हणून विद्वत्तेचा लोकसेवेत स्वराज्याच्या उठावासाठी उपयोग करणाऱ्या या दीर्घोद्योगी व चिकाटीच्या पुरुषसिंहाची सरकारला नेहमीच अचडण होई. १९०१ मध्ये लाकडी तलवार-बंदुकांनी का होईना, पण राष्ट्रीय शाळांतील विद्यार्थ्यांना लष्करी कवायत शिकवा, असा आदेश टिळकांनी दिला होता. याची नोंद मध्यप्रांत सरकारमार्फत ब्रिटिश सत्ताधाऱ्यांस पोहोचताच, या सत्ताधाऱ्यांचा तिळपापड झाला होता; पण कैसरीकंदनाच्या निमित्ताने रंगरूटभरतीचा प्रचार करून त्याबद्दल हमी देणाऱ्या टिळकांबद्दल ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना 'असून अडचण, नसून खोळंबा' वाटू लागला. कारण मागे, बोअर लोकांनी ब्रिटिश लोकांना दाखविलेला हात, रशियावर जपानने मिळविलेला विजय याची उदाहरणे देऊन शिवाजी-गणपतीउत्सवांतून टिळकांनी स्वच्छ सांगितले नव्हते काय की युरोपीय दिमाखशाही आता ढासळू लागली आहे म्हणून? झामोरीनने भारताच्या किनाऱ्याला पाय लावल्यापासून तागडी-तलवारींच्या तक्तनशीनतेच्या युगाला सुरुवात झाली होती; ते युग १८९९ पासून पालटण्यास सुरुवात झाली,



हे टिळकांच्या दृष्टीला दिसले, आणि त्या राजकीय दृष्टीचा जाहीर उच्चार त्यांनी १९०४-१९०५ सालीच केला होता, ही नोंद काय ब्रिटिश सरकारजवळ नव्हती? म्हणून, त्या युगपालटात कैसरीकंदनाचा कल्लोळ उठताच, रंगरूटभरतीच्या प्रचाराला स्वराज्य सोपानाचा उठाव म्हणून टिळाकांनी हात घातला असता, स्वदेशीच्या प्रचाराने तरुण विद्यार्थी मनावर आणि दारूनिरोधनाच्या निमित्ताने समाजातील अशिक्षितांवरदेखील आपली छाप ठेवणाऱ्या टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेचा फायदा घेताना जगातील आपली पत किती उतरेल, याचा ठणका ब्रिटिश सरकारला लागलेला असे.

बरे, टिळकांच्या मागे असलेल्या त्या लोकशक्तीचा फायदा न घ्यावा, तर गांधींच्या मते पुढारीपणाचा हिमालय असलेल्या त्या पुरुषाला डावलून भारताची लोकशक्ती साम्राज्याच्या उपयोगी तरी पडणार कशी? म्हणून, गांधींच्या शब्दाला मान देऊन, दिल्लीच्या नसले तरी, मुंबईच्या वॉर कॉन्फरन्सला टिळकांना

अळेबळे बोलावण्यात आले. पण सरकारला भीती वाटत होती, तोच प्रत्यय तेथे उभा राहिला. इराण, अफगाणिस्तान, चीन येथे झालेल्या राष्ट्रीय जागृतीकडे भारताच्या तरुण पिढीचे १९०६ सालापासून लक्ष वेधणारे आणि स्वदेशी उद्योगधंद्यांच्या उपयोगी अशी यंत्रसामग्री खरेदी करण्याच्या वाटाघाटीच्या निमित्ताने रशियन कॉन्सलच्या मुलाखती घेणारे टिळक, मुंबईच्या वॉर कॉन्फरन्समध्ये, त्यांनी, स्वराज्य व संरक्षक सैन्याचे विवेचन सुरू करताच ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना दिसू लागले!!! टिळकांनी रंगरूटभरतीसंबंधी बोलावे, स्वराज्यासंबंधी बोलू नये, असा दंडक सत्ताधाऱ्यांनी घालताच- 'न गणसि मज जातो तुच्छ मानूनि तूते!' असे म्हणून टिळकांनी त्या वॉर कॉन्फरन्समधून बहिर्गमन केले. मग टिळकांना एकजिनसी भाषणबंदीच झाली. पण मुंबईच्या खास अधिवेशनात काँग्रेसमध्ये टिळकांनी छाप पाडली आणि पुढे माँटेग्यूसाहेबांनी 'स्वराज्या'चे चित्र देऊ केले होते, त्याबाबत इंग्लंडला जाणाऱ्या काँग्रेसतर्फेच्या शिष्टमंडळात टिळकांचे नाव प्रामुख्याने आले. हे पाहताच, टिळकांना विलायतेत जाण्यास बंदी करण्याचीच कारवाई झाली आणि कोलंबोहून त्या शिष्टमंडळाला व टिळकांना परतावे लागले!!!

सत्तासंबंधित कायदेशीरपणाचे अशा तऱ्हेचे उपाय योजून टिळकांना जनतेतून दूर करण्याचा आणि जनतेतून उठविण्याचा प्रयत्न ब्रिटिश सत्ताधारी आपल्या इभ्रतीसाठी करीत असले, तरी मनुष्यस्वभावाला धरून तो उघड उघड सामना तरी मानता येईल. पण टिळकांना माणुसकीतून आणि जन्मातूनच उठविण्याचा प्रयत्न ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी आपल्या हस्तकांकरवी 'ताई-महाराज दत्तक प्रकरण' पेटवून केला होता. ज्या शीलामुळे टिळकांचे मतविरोधक व सामान्य जनता टिळकांना अत्यंत मानी, ते शील कलंकित असल्याचे शिक्कामोर्तब न्यायासनाकडून मिळविण्याचा तो अट्टाहास होता. खोटे कागदपत्र तयार करणारा कुटिल म्हणून टिळकांना

ठरविण्याचा तो डाव सरकार चांगले एक तपाच्यावर खेळले; तरी मार्च १९१५ मध्ये प्रिव्ही कौन्सिलचा निकाल टिळकांच्या बाजूने लागल्याकारणाने, सरकारचीच इज्जत उतरली व टिळकांची वाढली. १९१७ साली व नंतर होमरूलच्या चळवळीने टिळकांची लोकप्रियता गौरीशंकराइतकी उंच, धवल व नजर न ठरणारी केली. असा मनुष्य शिष्टाईच्या निमित्ताने इंग्लंडमध्ये गेला तर, स्वराज्याच्या मागणीच्या निमित्ताने एवढे आंदोलन उठवील की, भारतातील ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचीच नव्हे तर, ब्रिटिश साम्राज्याच्या सूत्रधारांची पत 'दोस्त राष्ट्रांत' व एकंदरीने जगात हादरेल, अशी वेठ ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या पोटात उठत होती. १९१६ च्या १६ जानेवारीस म्हणजे रानडे पुण्यतिथीस पुण्याच्या टेम्परन्स असोसिएशनतर्फे सभा भरली असता, 'मद्यपानाचे व्यसन ज्या सरकारला निर्मूल करता येत नाही, ते राज्य करायला लायक नव्हे; आम्हा लोकपुढाऱ्यांच्या हाती सत्ता द्या, यत्किंचित विरोधाशिवाय लवकरात लवकर आम्ही ते निर्मूळ करून दाखवितो', असा कारभारकुशलतेचा आत्मविश्वास टिळकांनी प्रगट केला होता. ते टिळक विलायतेला गेल्यावर आपले वाभाडे काढल्याशिवाय राहणार नाहीत, अशी खात्री ब्रिटिश सत्ताधाऱ्यांची होती. म्हणून त्यांनी शिष्टमंडळ कोलंबोहून परत फिरवून मरणाला रात्र आडवी घातली.

पण, साम्राज्याचे ग्रह बरे नव्हते. टिळक मंडालेस अडकले असता सर व्हलेंटाईन चिरोल यांनी 'भारतीय अस्वस्थता' या नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले होते. भारताच्या राजकीय असंतोषाचे जनक म्हणून टिळकांना ठरविताना अनेक नकोत ते आरोप टिळकांवर चिरोलनी केले होते. त्यांचा निरास ब्रिटिश न्यायमंदिरात करून घेण्यासाठी टिळकांनी चिरोलवर फिर्याद लावली होती. १८९८ साली ग्लोब पत्राला नोटीस देताच त्या पत्राने टिळकांची माफी मागून दुष्काळ-फंडास काही रक्कम दिली होती. पण चिरोलनी

खटला चालवून घ्यायचे ठरविले. त्या निमित्ताने टिळकांना विलायतेस जाण्याची परवानगी देणेच साम्राज्य सरकारला भाग पडले. टिळकांना त्या खटल्यातूनही विलायतेत शिजवायच्या राजकारणाची मातब्बरी जास्त होती. टिळकांचे स्नेही होमरूल लीगची चळवळ घेऊन अगोदरच विलायतेस गेले होते. बॅ. बॅप्टिस्टा यांनी विलायतेतील मजूरपक्षाची सहानुभूती हिंदुस्थानच्या आशाआकांक्षांशी समरस करून घेतली होती. बॅ. बॅप्टिस्टांच्या या कामगिरीचा अहवाल ता. ३ फेब्रुवारी १९१८ च्या मराठा पत्रात आला आहे. त्यात सुरेंद्रनाथ बॅनर्जी किंवा टिळक यांच्यासारख्या पुरुषसिंहाने ब्रिटिश पार्लमेंटला भारतीय आकांक्षांचा ढळढळीत आराखडा सादर करणे परिणामकारक ठरेल असे स्पष्ट म्हटले आहे. त्याच दिशेने प्रयत्न करण्यासाठी टिळकांना विलायतेस जायचे होते. शिवाय, भारताचे राजकारण भिक्षांदेहीचे नाही. हक्काचे आहे, हेही आता जगाच्या मनावर ठसवायचे होते. कैसरीकंदन लढले गेले ते जगाला शांतियुग देण्यासाठी! तर जगाचा एकपंचमांश भाग जो भारत तो पारतंत्र्यात राहू देता उपयोगी नाही, हे टिळकांना स्पष्ट करायचे होते. म्हणून चिरोल केसच्या निमित्ताने विलायतेस जायला मिळताच (पुढे चिरोल केस हरावी लागली तरी) टिळकांनी विलायतेत मोठे राजकारण केले. ता. २२ ऑक्टोबर १९१७ रोजी अमेरिकेत भारतीय होमरूल लीगची जी शाखा काढली होती, तिच्यामार्फत चळवळ करण्यासाठी लाला लजपतरायांना पाच हजार डॉलर्स टिळकांनी बेझंटबाईच्या एका थिऑसफिकल बाईमार्फत पाठविले होतेच. विलायतेतील मजूरपक्षालाही दोन हजार पौंड टिळकांनी निवडणुकीसाठी दिले. एखाद्या मजूरपक्षीयाकडून हिंदुस्थानच्या होमरूलचे बिल पार्लमेंटात मांडण्याचा टिळकांचा बेत होता. पण निवडणुकीतील निकालाने टिळकांची निराशा झाली.

शिष्टमंडळ घेऊन टिळक १९१८ साली विलायतेस जाणार

होते: ती वेळ म्हणजे जर्मन आक्रमणाच्या चढत्या तारेची होती. साम्राज्य सरकारने त्याच कारणासाठी त्या टिळकांना परवाना नाकारला होता. चिरोल केसच्या निमित्ताने ता. ९ नोव्हेंबर १९१८ रोजी टिळक विलायतेत उतरले आणि अनेक गोंधळांनी त्यांच्याभोवती कल्लोळ केला तरी अनेक सभासत्रांत त्यांनी लक्ष घातले. आपल्यासमोर असलेल्या श्रोत्यांच्या मगदुराप्रमाणे आपल्या आपल्या भावनांचा आविष्कार टिळकांनी मोठ्या कौशल्याने केला. 'एन्.एल्.सी.' पुढे बोलताना टिळक एवढ्या संयमाने बोलले की श्रोत्यांवर त्यांची छापच पडली. लोकशाहीच्या तत्त्वप्रणालीच्या भोक्त्या अशा नॅशनल लिबरलस्ना तर टिळकांबद्दल नितांत आदर वाटू लागला. केंब्रिजच्या मजलसीतून टिळकांचा जहालपणा प्रगट झाला व पूर्व-पश्चिमची निशाणे फडफडली. तथापि सर्वसामान्यपणे टिळकांची व्याख्याने विचारपरिप्लुत झाली आणि ब्रिटिश साम्राज्यातून भारत वेगळा करावा ही भाषा टिळकांनी भारतीय स्वराज्याची मागणी ठासून करतानाही काढली नाही. होऊ घातलेल्या मॉंटफोर्ड सुधारणा कुचकामाच्या असून संपूर्ण स्वराज्य चालविण्यास भारतीय जनता परिपक्व आहे, हे स्पष्ट सांगण्यासही टिळक चुकले नाहीत.

पण या सर्व जाहीर व्याख्यान प्रचारापेक्षा दुसऱ्या गोष्टींत टिळक अधिक लक्ष घालीत होते. याचा पुरावा कदाचित इंग्लंडच्या मध्यवर्ती हेरखात्यातही सापडण्याचा संभव आहे. टिळकांच्या मजूर पक्षातील स्नेह्यांनी त्यांना इंग्लंडमध्ये बोल्शेव्हिक प्रवृत्तीचा प्रसार कसा होतो आहे याची माहिती दिलीच होती. इंग्लंडने आखलेल्या 'डिमोबिलायझेशन'च्या धोरणामुळे जे असमाधान व अस्वस्थता माजली होती तिचा फायदा कसा घेता येईल या विचाराने टिळक मिलिटरी सिच्युएशनचेही निरीक्षण करीत होते. टिळकांच्या मागून काही महिन्यांनी इंग्लंडमध्ये आलेल्या बेझंटबाईही टिळकांच्याच

तंत्राने भारतीय लोकशाही स्वराज्याचा पुरस्कार करू लागल्यावर टिळकांच्या भक्तगणांनी सिन्‌फीन चळवळीशी आपले घनदाट संबंध ठेवले. सिनफिन् चळवळीतील भगिनी मंडळाने तर वेळी-अवेळी आणि प्रसंगी विषयांतर करूनही भारतीय होमरूलचा उठाव केला. टिळक आणि मजूर पक्ष हे तर इतके एकजीव झाले की, आयरिश लेबरपार्टी ही टिळकांच्या आकांक्षांचे एकमेव आशास्थान बनली. ही गोष्ट सर्व राजकारणी विचारवंतांच्या डोळ्यांवर त्या काळी चांगलीच आली होती. रॉबर्ट विल्यम्स, रॉबर्ट स्मिली, जॉर्ज लॅन्सबरी, जोशिया वेजवुड हे टिळकांचे जिवश्चकंठश्च असल्याचे बोलले जात असे. टिळक जाहीर सभांतून संयम आणि सौम्यपणा राखीत असले तरी खासगीत ते तसे नव्हते. पाडव्याच्या दिवशी (न्यू इयर्स डे) बोलताना त्यांनी स्पष्टच सांगितले की, इंग्लंड हिंदुस्तानला आपण होऊन कधी स्वराज्य देईल, हे शक्यच नाही. मॉट-फोर्ड सुधारणा म्हणजे जगाच्या डोळ्यांवर घालायची झापड असून खजिना, सैन्य, व्यापारी नियंत्रण आणि अंतर्गत व्यवस्था ही खाती हाताळणारे इजिप्तसुद्धा कसे गुलाम राष्ट्र आहे हे टिळकांनी स्पष्ट केले. जगाच्या राष्ट्रात हिंदुस्थानला मानाचे स्थान मिळवायचे असेल, तर इंग्लंडशी हिंदुस्थानचे संबंध सर्वस्वी तोडून 'झाडून साफ' (क्लीन औट) झाले पाहिजे, असे टिळकांनी स्वच्छच सांगितले. त्या राजकारणाच्या यशासाठी जगाचे लोकमत सहानुभूतीने उभे केले पाहिजे, असा टिळकांचा कटाक्ष होता. म्हणून न्यूयॉर्कमध्ये असणाऱ्या लाला लजपतराय यांच्याशी टिळकांचा पत्रव्यवहार संततधारेने चाले व एडगर वॅलेस यांच्या मदतीच्या जोरावर इंग्लंड-अमेरिका या देशांतील वृत्तपत्रीय मोहीम टिळकांनी सुरू केली.

अफगाणिस्थानातील त्या वेळी उडालेल्या ब्रह्मघोटाळ्याने व गांधींच्या चळवळीने अमृतसरला झालेल्या खळबळीने टिळकांना आनंद झाला होता व बोल्शेव्हिकांच्या धर्तीवरील मजुरांच्या

चळवळीच्या जोरावर हिंदुस्थानचा राजकीय मोक्ष होईल अशी त्यांना आशा वाटू लागली होती, असे गणित इंग्लंडच्या हेरगिरीने मांडलेही होते. शांतता परिषदेस पॅरिसला जाण्यास टिळकांनी परवानगी मागितली असता ती का नाकारण्यात आली, याचा वरील विवेचनावरून उलगडा होईल. तथापि, भारताच्या लोकशाही स्वराज्याचा काळ समीप आल्याचा दृक्प्रत्यय टिळकांस स्वच्छ येत होता. अमेरिकन-जपानी प्रश्न आणि रुसो-इंडियन प्रश्न यांना टिळक फार महत्त्व देत होते. रवींद्रनाथ टागोरांनी दुसरा टॉलस्टॉय होऊन भारतीय व जपानी पुढाऱ्यांची अशी युती घडवावी की इंग्लंड-हिंदुस्थानचे बिनसल्यास आपल्या लढाऊ शक्तीनिशी जपानने भारतीय पुढाऱ्यांचा पाठपुरावा करावा, अशी टिळकांची अपेक्षा होती. भारतीय तरुण बुद्धिवंतांनी शास्त्रीय व वैज्ञानिक प्रगतीवर भर ठेवून, काळ येईल तेव्हा भारताची प्रतिष्ठा आणि प्रभाव राखण्याची जबाबदारी घ्यावी अशीही टिळकांची अपेक्षा होती.

इंग्लंडमध्ये गेलेल्या टिळकांच्या या चौफेर नजरेतून आलेल्या अनुभवातील आत्मविश्वासामुळेच व्हर्सायच्या तहाच्या वेळी व राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्या वेळी टिळकांनी प्रेसिडेंट विल्सनला पत्राने निःसंदिग्धपणे कळविले होते की, 'भारतासारखी राष्ट्रे गुलामच राहिली तर शांतियुगासाठी स्थापन होणारा राष्ट्रसंघ हा नुसता बाजार ठरेल.' याच अर्थाचे पत्र तहपरिषदेचे अध्यक्ष एम. क्लेमेको यांनाही त्यांनी लिहिले होते. टिळकांच्या या अर्थाच्या पत्राची परिस्फुटता होताच इंग्लंडचे मुत्सद्दी कावरेबावरे झाल्याशिवाय राहिले नाहीत. जागतिक लोकमत आपल्या पाठीशी उभे करून भारतीय स्वातंत्र्य प्रतिष्ठेने प्रस्थापित होण्यासाठी व टिकविण्यासाठी १९२० साली कलकत्त्याच्या खास अधिवेशनात गांधीजींच्या असहकाराला काँग्रेसने म्हणजेच भारताने साथ देताच, आपण इंग्लंडात जाऊन तेथील लोकमत गांधींच्या पाठीशी उभे करणार असा आपला बेत काकासाहेब

खाडिलकरांना टिळकांनी बोलून दाखविला होता, त्यातील रहस्य काय याचा आता निराळा उलगडा नको.

भारताचे राजकारण हेच आपले जीवितसार मानल्यापासून टिळकांनी त्यांची प्रगती कोठवर केली याची मीमांसा वरील विवेचनावरून कोणासही होण्यासारखी आहे. पारतंत्र्यामुळे बर्फाचा गोळा होऊन पडलेल्या भारताला चैतन्याची ऊब न्यायमूर्ती रानडेंनी आपल्या सर्वज्ञतेने दिली, तर त्या चैतन्याला कर्तृत्ववंत व प्रभावी करण्याची आणि स्वराज्यसंचालक असे शक्तिमंत बनविण्याची कामगिरी टिळकांनी केली. पण या कामगिरीबरोबर टिळकांच्या विद्वत्तेने 'वेदांचे प्राचीनत्व', 'वेदातील आर्यांचे मूलस्थान' आणि 'गीतारहस्य' असे ग्रंथ जगाला दिले व ते जगन्मान्यता पावले. सूक्ष्मसंशोधन बुद्धीचा पूर्णावतार म्हणून पहिल्या दोन ग्रंथांनी टिळकांचे नाव केले तर लोकसंग्रह करून जीवनाची कर्तव्ये निष्काम कर्मयोगाने कशी करावीत आणि व्यवहाराला परमार्थाची जोड खासगी प्रपंचातच नव्हे तर राष्ट्रीय प्रपंचातही कशी द्यावी हे टिळकांनी गीतारहस्याच्याद्वारा लोकांना शिकविले. लोकशाही राजकारणाला अध्यात्माची जोड देणारे हे लोकसंग्रही तत्त्वज्ञान टिळकांनी स्वतःच्या आचरणाने व्यवहारस्पष्ट केले होते. म्हणून 'आधी केले मग सांगितले' अशी अनुभवसिद्धता त्या ग्रंथाला जुळून बसली. राष्ट्रातील उमलत्या पिढीपासून राष्ट्रप्रपंच चालविणाऱ्या पुढाऱ्यांपर्यंत जागतिक दृष्टीने व आध्यात्मिक समाधानाने आपल्या राष्ट्राची व जगाची कर्तृत्ववंत सेवा करणाऱ्या सर्वांना अनेक तपे मार्गदर्शन करीत राहणारे टिळकांचे चरित्र हेच विसाव्या शतकातील पहिल्या पंचविशीच्या जगद्गुरूचे चरित्र जे मानण्यात येते ते वरील ग्रंथांमुळे होय. त्याचा अभिमान प्रत्येक भारतीयाला सहजच वाटतो व कृतज्ञतेने टिळकांची पूजा करण्यास तो सहजच बद्धपरिकर होतो.

# लोकमान्यांचा वारसा

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हा भारताचा कर्तबगार नेता होता. अशा माणसांची उंची वर्षांच्या गणनेने मोजायची नसते. कर्तृत्वाच्या कसोटीवर त्यांची उंची डोळ्यात भरत असते. पृथ्वीच्या पाठीवर असलेला जिवंत बुद्धीचा प्रत्येक भारतीय 'तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हा घडो।।' अशी प्रार्थना करीत असतो. याचे कारण लोकमान्य टिळकांनी आपल्या कर्तृत्वाचा शिलालेख काळाच्या कपाळावर असा कोरून ठेवला आहे की, त्याचा वारसा पुढील अनेक पिढ्यांना अभिमानास्पद होईल.

बाळ गंगाधर टिळक हे एका प्राथमिक शिक्षकाचे हुशार व बाणेदार चिरंजीव म्हणूनच शाळेत आल्यापासून चमकत होते. 'शरीरमाद्यं खलु सर्वसाधनम्' हा ठसा त्यांच्या बालमनावर इतका तीव्र उमटला होता की कॉलेज शिक्षणाचा एक वर्ष खोळंबा करूनही त्यांनी आपले शरीर बळकट बनविले. राष्ट्राच्या सामान्य नागरिकाचे मन, मेंदू आणि मनगट ही निखालस दणगट पाहिजेत, असा तो पीळ होता.

आपण पदवीधर झालो तरी आपले हजारो देशबांधव अज्ञानधःकारात आहेत. जग कोठे आहे, आपल्या भारत देशाची त्या जगात काय अवस्था आहे आणि ज्या देशाच्या अन्नपाण्यावर आपण जगत असतो, त्याच्यासंबंधी आपल्याला काही कर्तव्य आहे की नाही व असल्यास आपण ते कर्तव्य बजावतो कितपत, या बाबतीत सगळीकडे अज्ञानच अज्ञान आहे; त्या अज्ञानाचा

फायदा घरचे आणि दारचे चोर घेतल्याशिवाय सोडत नाहीत. ही दारुण अवस्था लक्षात आल्याबरोबर विद्यार्थीदशेतच 'व्यापक लोकशिक्षण' हे आपल्या आयुष्याचे ध्येय टिळकांनी ठरविले आणि त्या व्यापक लोकशिक्षणाच्या ध्येयासाठी आपत्ती आणि हालअपेष्टा निष्ठेने टिळक सोशीत राहिले. जीवनाचे ध्येय विद्यार्थिदशा संपतांना भारतीय नागरिकांना मुक्रर करता आले पाहिजे; आणि ते करताना आपण कमावलेली विद्या समाजाच्या सेवेकरता आहे; तिचा तसा उपयोग होत नसेल, तर ग्रंथालयातील कपाटांना शोभा आणणाऱ्या पुस्तकापलीकडे त्या विद्येची सार्थकता नाही असा उद्बोध टिळकांच्या त्या ध्येयनिश्चितीत होता.

आपली विद्या ही आपल्या देशबांधवांना 'शहाणे करून सोडण्यासाठी' हवी, हे जितके खरे, तितकेच त्या विद्येच्या जोडीला संशोधनबुद्धी असेल तर, एकंदर राष्ट्राची प्रतिष्ठा जगात वाढविण्यात त्या संशोधनबुद्धीचा उपयोग झाला पाहिजे, असाही टिळकांचा कटाक्ष होता. म्हणूनच, स्वास्थ्याची वाट न पाहता, ऐन धामधुमीच्या चळवळीत गुंतले असता अगर खडतर तुरुंगवास भोगत असताही टिळकांनी 'वेदकाळ', 'आर्यांचे मूळ वसतिस्थान' आणि 'गीतारहस्य' हे अजरामर ग्रंथ लिहून स्वतःबरोबर भारताची प्रतिष्ठा जगाच्या विद्वानांमध्ये चमकविली.

लोकशिक्षणात जर लोककल्याण व लोकप्रतिष्ठा हे सूत्र टिळकांनी ठेवले होते तर देशभक्ती करताना बहुजन समाजाची एका बाजूने सेवा करावी आणि त्या सेवेच्या जोरावर 'आईच्या दूधभाताने मुलाला बाळसे येते तसे' समाजशक्तीचे संगोपन करता करता, समाजाला कार्योत्थापन द्यावे, हा टिळकांच्या सर्व सामाजिक, राजकीय व आर्थिक चळवळीचा रोख होता. गणपतीउत्सव सुरू करून टिळकांनी पुढारी व जनता यांमधील अंतर तोडले. त्या दोघांनी केव्हाही भेटावे आणि समरसतेने व पावित्र्याने समाजजीवनाचा

विचार करावा. शिवाजी उत्सवाने टिळकांनी एक आदर्श पुरुष जनतेपुढे ठेवला आणि जणू सवाल टाकला की त्या महापुरुषाला त्याच्या काळी हाती असलेल्या साधनांनी जे करता आले ते आपल्या काळी आपल्याला का करता येऊ नये? फार गंभीर होता हा प्रश्न. संशयातीत शीलाचा पुढारी 'धर्मासाठी आम्ही घेतली फकिरी!' म्हणून जेव्हा लोकनायकत्व करतो, त्या वेळी त्याच्या मागून ज़ाण्यात लोकांना एक तऱ्हेचा निर्धास्तपणा वाटतो व दुसऱ्या बाजूने, त्या पुढाऱ्याच्या शब्दासाठी जीवाची तमा न बाळगण्याची प्रवृत्ती लोकांत होते. असे पुढारी व असे लोक असले म्हणजे पारतंत्र्य औषधालाही उरत नाही, असा टिळकांचा विश्वास होता. तो त्यांनी आचरणशुद्ध राखला. म्हणूनच ते लोकमान्य झाले, युगपुरुष ठरले.

लोकमान्यांचे चरित्र व त्यांचे वर दिलेले 'पंचशील' हा भारतीय तरुणांचा वारसा आहे व तो तेजस्वीपणाने चालविण्यातच कृतज्ञ भारतीयांची टिळक-पूजा आहे.

## लोकमान्य नमोस्तुते।

पारतंत्र्याबद्दल असंतोषाचा जनक, स्वराज्याचा मंत्रद्रष्टा आणि परकिय सत्तेविरुद्धची संतत धार म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक! साधा मनुष्य आणि प्रगाढ पंडित म्हणूनही भारताचा मान आणि भारताची मान टिळकांनी उंचावली आहे. निष्काम कर्मयोग टिळकांनी जगाला शिकवला. भारताला संजीवनी देण्यासाठी त्यांनी शिवाजीचा राष्ट्रीय आणि गणपतीचा सांस्कृतिक उत्सव सुरू केला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच' हा आत्मविश्वासाचा बीजमंत्र भारताला सांगितला. स्वार्थत्यागाच्या जीवानातून फुललेला स्वातंत्र्याचा वृक्ष आपल्या फळांनी आपल्या राष्ट्राला पुष्ट बनवितो व शेजारच्या राष्ट्रांना तेजस्वी संरक्षण देतो. लो. बाळ गंगाधर टिळकांच्या चरित्राचे हे प्रबोधन आहे. म्हणूनच कृतज्ञतेने आपण म्हणत असतो -

लोकमान्याय पूज्याय लोककल्याण कारिणे।
मोहशोक विनाशाय, योगेश्वर, नमोऽस्तुते।।

---

कव्हर छपाई 'विनायक आर्टस'